**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०५ मे २०२५**

**ठळक बातम्या**

- **पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर चिनाब नदीवरल्या बागलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारं पाणी अडवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय.**
- **वक्फ सुधारणा कायदा २०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आता येत्या १५ मे रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी.**
- **राज्य शिक्षण मंडळाच्या, इयत्ता बारावीचा निकाल जाहीर, नागपूर विभागाचा निकाल ९० पूर्णांक ५२ शतांश टक्के.**
- **विदर्भात आज भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, यवतमाळ, वाशिम आणि बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानसह गारपीटीची शक्यता.**

**आता सविस्तर बातम्या .......**

पाणी अडवण्याचा निर्णय

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर चिनाब नदीवरल्या बागलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारं पाणी अडवण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे. तसंच झेलम नदीवरल्या किशनगंगा धरणाचं पाणी रोखण्याचा विचारही भारत करत असल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे. २२ एप्रिलला पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिक मृत्युमुखी पडले होते, त्यानंतर भारतानं पाकिस्तानसोबतचा पाणी वाटपाचा सिंधु करार रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. १९६० मधे हा करार करण्यात आला होता. बागलिहार धरणावरून भारत आणि पाकिस्तानमधे गेल्या अनेक वर्षापासून वाद आहे.

राजनाथ सिंह

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची आज जपानचे संरक्षण मंत्री जनरल नाकातानी यांच्याबरोबर नवी दिल्ली इथे द्विपक्षीय बैठक घेतली. जपान कायम भारताला पाठिंबा देत आल्याचे राजनाथ सिंग यावेळी म्हणाले -

***I would like to thank the Government of Japan for their strong creation of solidarity with India in the wake of the Pahalgam terrorist attack. Excellency, I take this opportunity to compliment you for your*** **immense** ***contribution in deepening the Indo - Japan Defence relations.***

दरम्यान, या बैठकीपूर्वी जनरल नाकातानी यांनी नवी दिल्लीतल्या शहीद स्मारकावर आदरांजली वाहिली. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात संरक्षण मंत्र्यांच्या आसियान विषयक संवादानंतरची दोन्ही देशांच्या संरक्षण मंत्र्यांमधली ही दुसरी बैठक आहे.

आशियाई विकास बँक

आशियाई विकास बँकेच्या म्हणजेच एडीबीच्या नियामक मंडळाच्या 58व्या वार्षिक बैठकीला आजपासून इटलीमध्ये सुरुवात होणार आहे. या चार दिवसीय बैठकीत अर्थमंत्री निर्मला सीतारामन भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करणार आहेत. त्याचबरोबर, एडीबीचे अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीचे अध्यक्ष आणि जपान बँक फॉर इंटरनॅशनल कोऑपरेशनच्या गव्हर्नरांसमवेत बैठका घेतील, तसंच सीतारामन इटली, जपान आणि भूतान च्या अर्थमंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चादेखील करणार आहेत. त्याचबरोबर मिलानमधल्या भारतीय समुदायाशीही त्या संवाद साधणार आहेत. तसंच बोकोनी विद्यापीठातल्या एका चर्चासत्रालाही सीतारामन उपस्थित राहाणार आहेत.

विनोद अग्रवाल

गोंदिया जिल्यात मागील चार दिवसात अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात शेती पिकांचे आणि घरांचे नुकसान  झाले. गोंदिया विधानसभा क्षेत्राचे आमदार विनोद अग्रवाल यांनी आज थेट बांधावर जाऊन शेती पिकांची पाहणी करत लवकरात लवकर पंचनामे करून नुकशान भरपाई देण्याच्या सूचना आमदार विनोद संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.....

***हमने आज खातिया अन्य गांव में किस प्रकार से घरों का और खेती का नुकसान हुआ है, यह बात प्रशासन के ध्यान में लाकर के दी है और आज***

***प्रशासन एक स्टैंडिंग ऑर्डर के माध्यम से ग्राम सेवक तलाठी और कुर्सी सहायक, इनका संयुक्त नुकसान के पाहणी वो करेंगे, पंचनामा तैयार करेंगे।***

वक्फ सुधारणा कायदा

वक्फ सुधारणा कायदा २०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आता येत्या १५ मे रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्यासह न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी होणार होती.मात्र आपण लौकरच सेवानिवृत्त होणार असल्यानं ही सुनावणी भावी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या पीठासमोर होईल, असं सांगून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी पुढची तारीख दिली आहे. या संदर्भात यापूर्वी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयानं काही मुद्द्यांवर चिंता व्यक्त केल्यानंतर केंद्र सरकारनं कायद्यातल्या काही तरतुदींना स्थगिती दिली आहे. नोंदणीकृत आणि अधिसूचित वक्फ मालमत्ता तसंच वापरकर्त्यांकडून वक्फ घोषित झालेल्या जमिनींच्या सद्यस्थितीवर कोणताही परिणाम होणार नाही, अशी ग्वाही केंद्र सरकारनं दिली आहे.

बारावी परीक्षेचा निकाल

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. परीक्षेचा एकूण निकाल ९१ पूर्णांक ८८ शतांश टक्के इतका लागला आहे. मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या ९ विभागीय मंडळात बोर्डाची परीक्षा घेण्यात आली. कोकण विभागाचा निकाल ९६ पूर्णांक ७४ शतांश टक्के लागला असून हा विभाग पुन्हा एकदा अव्वल स्थानी आला आहे. त्यापाठोपाठ मुंबई विभागाचा निकाल ९२ पूर्णांक ९३ शतांश टक्के लागला आहे, पुणे ९१ पूर्णांक ३२ शतांश टक्के, नागपूर ९० पूर्णांक ५२ शतांश टक्के, छत्रपती संभाजीनगर ९२ पूर्णांक २४ शतांश टक्के, कोल्हापूर ९३ पूर्णांक ६४ शतांश टक्के, अमरावती ९१ पूर्णांक ४३ शतांश टक्के, नाशिक ९१ पूर्णांक ३१ शतांश टक्के, तर लातूर विभागाचा निकाल सर्वात कमी म्हणजे ८९ पूर्णांक ४६ शतांश टक्के इतका लागला आहे. राज्यात ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत बारावीची परीक्षा घेण्यात आली होती. एकूण १४ लाख

१७ हजार ९६९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. विद्यार्थ्यांना उद्यापासून महाविद्यालयात गुणपत्रिका मिळणार असल्याची माहिती, मंडळांनं दिली आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९७ पूर्णांक ३५ शतांश टक्के, कला शाखेचा ८० पूर्णांक ५२ शतांश टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ९२ पूर्णांक ६८ शतांश टक्के इतका लागला आहे.

हवामान

विदर्भात आज भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, यवतमाळ, वाशिम आणि बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानसह गारपीटीची शक्यता असून नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने या जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मेघ गर्जनेसह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता असल्याने याठिकाणी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. आज सकाळी नागपुरात काही ठिकाणी पाऊस झाल्याने कमाल तापमानात घट झाली असून आज 39 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे. उद्या देखील बुलढाणा, अकोला आणि वाशिम हे जिल्हे वगळता विदर्भाच्या उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट कायम राहणार आहे.

“टेक वारी

प्रशासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कौशल्य विकासासाठी, “टेक वारी: महाराष्ट्र टेक लर्निंग वीक” या सप्ताहाचं आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मंत्रालयात उद्घाटन झालं. राज्य शासनाने आयोजित केलेल्या या पहिल्या डिजिटल वारी मध्ये आधुनिक तंत्रज्ञान आणि नवीन कल्पनांचा संगम असून, ही वारी मंत्रालयातून सुरू होऊन राज्यभरात तंत्रज्ञानाचा प्रसार करणार आहे.

दिव्यांग सर्वेक्षण

नागपूर महानगरपालिकेद्वारे दिव्यांगांचा एकत्रित डाटा संकलीत करण्यासाठी आशा सेविकांमार्फत सर्वेक्षण करण्यात येत आहे. यात २१ प्रकारच्या दिव्यांगत्वानुसार हे सर्वेक्षण सुरु आहे. यात ज्येष्ठ नागरिकांना भेडसावणाऱ्या शारीरिक तसच मानसिक व्याधींचा देखील समावेश होतो.

वयाच्या ५० ते ६० वर्षात दिव्यांगत्वाचा धोका वाढतो. या वयातील कोणत्याही व्यक्तीला अंधत्व, कर्णबधिरता, कम्पवात, स्मृतीभ्रंश ही समस्या असेल तर त्यांनी ती माहिती सर्वेक्षणासाठी आपल्या घरी येणाऱ्या मनपाच्या आशा सेविकांना द्यावी, अस आवाहन नागपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क कायदा २०१६ आणि महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार २१ प्रकारच्या दिव्यांगत्वानुसार नागपूर शहरात दिव्यांग व्यक्तींच होम टू होम सर्वेक्षण करण्यात येत आहे.

बाल विवाह

भंडारा जिल्हयातील-तुमसर तालुक्यातील गोबरवाही पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या एका गावात अल्पवयिन मुलीचा विवाह एका आंतरराज्यीय मुलासोबत लावून दिला मात्र याची. जिल्हा व महिला बालविकास विभाग भंडारा आणि चाइल्ड लाइन भंडारा यांच्या संयुक्त पथकान अल्पवयीन मुलीच गाव गाठत कारवाई केली. गोबरवाही पोलिस स्टेशन मध्ये विविध कलमान्वय चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

जनुकीय वाण

जनुकीय तंत्रज्ञानान तांदळाच वाण विकसित करणारा पहिला देश हा मान भारतान पटकावला आहे. भारतीय कृषी संशोधन परिषदेतर्फे विकसित करण्यात आलेल्या भारतीय जिनोम संवर्धित तांदळाच्या दोन वाणांचं लोकार्पण केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यानी काल नवी दिल्लीत केलं.

अंबा मिलेट महोत्सव

उत्पादक ते थेट ग्राहक विक्री संकल्पनेतून महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय नागपूर तर्फे स्थानिक कुसुमताई वानखेडे भवन उत्तर अंबाझरी मार्ग, इथं आंबा मिलेट आणि धान्य महोत्सवाच आयोजन करण्यात आल आहे. आज या महोत्सवाचा शेवटचा दिवस आहे.

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स या संघात सामना होणार आहे. हैदराबाद इथं संध्याकाळी साडे सात वाजता खेळाला सुरुवात होईल.

******